The Name Of Quality — Reliable Academy® — Founder : Manohar E. Patil — ISO 9001 : 2015

# महा TEST SERIES/ PSI/ STI /ASO (२०१९)

**Kalyan-Nashik-Parbhani** — **संयुक्त पुर्व सराव परिक्षा पेपर** — **Marks: 100**

**PAPER NO. 7** — **Test Series by : Nandini Manohar Patil** — **Time: 1 Hour**

१. A, B व C या तिघाजवळ काही रक्कम आहे. A व B यांच्या रक्कमांची सरासरी ६० रु. आहे. B व C यांच्या रक्कमेची सरासरी ८० रु. आहे तसेच C व A यांच्या रक्कमांची सरासरी ७० आहे तर A, B व C यांच्या तिघांच्या रक्कमांची सरासरी किती असेल?
अ) ६० ब) ७० क) ८० ड) ७५

२. खालील आकृतीत प्रश्नचिन्हाच्या जागी कोणती संख्या येईल?




अ) ३२७ ब) ३८६ क) ४३८ ड) ४६९

३. पोहण्याच्या स्पर्धेत सोना व मोना यांनी भाग घेतला. सोना म्हणाली "मी शेवटच्या मुलीच्या पुढे १२ वी होती". मोना म्हणाली, 'माझा स्पर्धेत १३ वा क्रमांक आला आणि सोना माझ्यापुढे पाचवी होती" तर एकूण स्पर्धक किती होते?
अ) २२ ब) २० क) ३२ ड) १५

४. **विधाने :** १) काही सरडे घोरपडी असतात.
२) एकही घोरपड अजगर नसते.
**अनुमाने :** i) काही सरडे अजगर असतात.
ii) कोणताही सरडा अजगर नसतो.
iii) सर्व घोरपडी सरडे असतात.
iv) एकही घोरपड सरडा नसतो.
१) फक्त i अनुमान निघते.
२) फक्त i किंवा ii अनुमान निघते.
३) फक्त ii व iv अनुमान निघतात.
४) एकही अनुमान निघत नाही.

५. P, Q, R, S, T आणि U एका प्रकाशन संस्थेमध्ये कार्यरत आहेत. यांमधील किमान दोघे मॅनेजर आहेत. किमान दोघे लिपीक आहेत. किमान एक अधिकारी आहे. संस्थेमध्ये संगणक, विक्री आणि विपिन असे तीन विभाग असून प्रत्येक विभागामध्ये किमान दोन कर्मचारी कार्यरत आहेत. कोणत्याही विभागात एकाच श्रेणीचे एकापेक्षा जास्त कर्मचारी नाहीत.
१) T हा विक्रि विभागामध्ये कार्यरत आहे पण तो लिपीक नाही.
२) संगणक विभागामध्ये मॅनेजर पदावर Q कार्यरत आहे.
३) P हा विपणन विभागामधील अधिकारी आहे.
४) T बरोबर R हा अधिकारी काम करतो.
५) U हा P च्या विभागामध्ये काम करत नाही.
U कोणत्या विभागामध्ये काम करतो?
अ) सांगता येणार नाही. ब) विक्री
क) संगणक ड) विपणन

६. एका वाहनतळावर प्रत्येक वाहनासोबत दोन माणसे उभी आहेत. तेथील वाहनांच्या चाकांची एकूण संख्या ८३ आहे. तर तेथील माणसांची एकूण संख्या ४६ आहे. तर तेथील ३ चाकी व ४ चाकी वाहनांची संख्या किती असेल?
अ) ३ चाकी ७ वाहने
ब) ३ चाकी ९ वाहने आणि ४ चाकी १० वाहने
क) ३ चाकी वाहने ९ आणि ४ चाकी १४ वाहने
ड) यापैकी नाही.

७. १८०० रु. किंमतीची साडी ५०% वाढवून ३०% सुट दिली तर साडीची विक्री किंमत किती रुपये असेल?
अ) २००० ब) २७००
क) १८०० ड) १८९०

८. खालील आकृतीत प्रश्नार्थक चिन्हाच्या ठिकाणी कोणता अंक येईल?




अ) १ ब) २४ क) ८ ड) ४८

९. लखन व निता यांचे लग्न १८ जानेवारी १९८० ला वार मंगळवार रोजी झाले तर लग्नाचा वाढदिवस सोमवारी किंवा बुधवारी आला तर ते चित्रपटाला जात नाही तर पहिल्या १० वाढदिवसात ते किती वेळा चित्रपटाला गेले नसतील?
अ) ४ ब) ३ क) २ ड) ५

RELIABLE ACADEMY 9222333999

१०. एका रांगेत रिना मध्यभागी उभी आहे तर तिच्या डावीकडे १२ व्या क्रमांकावर दर्शना उभी आहे व तिच्या उजवीकडे ८ व्या क्रमांकावर सोना उभी आहे; तर त्या रांगेत कमीत कमी किती मुली असतील?
अ) २१ ब) १९ क) २२ ड) २५

११. खालील X या आकृतीची पाण्यातील प्रतिमा कोणती ती ओळखा. ?



(X)

**उत्तर आकृती :**



अ) ब) क) ड)

१२. Q ची आई R ही P ची बहिण आहे तर R ही M ची मुलगी आहे. S ही P ची मुलगी व T ची बहीण आहे तर M चे T शी नाते कोणते ते ओळखा?
अ) आजी ब) वडील
क) आई ड) यापैकी नाही.

१३. एका पिशवीत ४३ सोडून सर्व लाल चेंडू आहेत. ४७ सोडून सर्व निळे आहेत, ५३ सोडून सर्व हिरवे चेंडू आहेत आणि ५२ चेंडू सोडून सर्व पांढरे चेंडू आहेत. तर त्या पिशवीत हिरव्या रंगाचे किती चेंडू आहेत?
अ) ६० ब) ६५ क) ५० ड) ५२

१४. खालील प्रत्येक प्रश्नातील शब्दगट कोणत्या वेन आकृतीशी संबंधीत आहे हे ठरवा व त्या आकृतीचे सांकेतिक अक्षर दर्शविणारा योग्य पर्याय निवडा.
सामान, रेल्वे, जहाज

१)


२)


३)


४)


अ) ४ ब) २ क) ३ ड) १

१५. एका चौरसामध्ये ९ समसमान चौरसांमध्ये विभाजन करण्यात आले. प्रत्येक आडव्या रेषेमध्ये किमान एक चेंडू येईल याप्रमाणे सहा चेंडू या ९ चौरसांमध्ये ठेवायचे आहेत. प्रत्येक छोटया चौरसामध्ये एकच चेंडू मावतो. तर सहा चेंडू किती प्रकारे मांडता येतील?
अ) ८१ ब) ५४ क) २७ ड) ३६

१६. स्वदेशी बनावटीचा पहिला मायक्रो - प्रोसेसर "शक्ती" कोणत्या आयआयटीमध्ये तयार करण्यात आला.
अ) आयआयटी बॉम्बे ब) आयआयटी कानपूर
क) आयआयटी मद्रास ड) आयआयटी दिल्ली

१७. योग्य जोडया लावा .

| **देश** | **राष्ट्रीय खेळ** |
|---|---|
| १) ब्राझील | i) व्हॉलीबॉल |
| २) अमेरिका | ii) कुस्ती |
| ३) श्रीलंका | iii) फूटबॉल |
| ४) इराण | iv) बेसबॉल |

| | १ | २ | ३ | ४ |
|---|---|---|---|---|
| अ) | iii | iv | ii | i |
| ब) | i | iii | ii | iv |
| क) | iii | iv | i | ii |
| ड) | iv | ii | iii | i |

१८. कोणत्या राज्यात दिनांक २६ ऑक्टोबरला 'कृषी कुंभ २०१८' या मेळाव्याचे उद्घाटन करण्यात आले -
अ) उत्तरप्रदेश ब) तामिळनाडू
क) सिक्कीम ड) महाराष्ट्र

१९. शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करण्यासाठी राष्ट्रपतींकडून तयार करण्यात आलेल्या राज्यपालांच्या समितीचे अध्यक्षपद .................... या व्यक्तीकडे आहे
अ) राम नाईक ब) सत्यपाल मलिक
क) लालजी टंडन ड) तथागत रॉय.

२०. देशात प्रथमच दुरुस्ती करण्यात आलेले रशियाच्या बनावटीचे पुढीलपैकी कोणते लढाऊ विमान दिनांक २६ ऑक्टोबर २०१८ रोजी भारतीय हवाई दलाकडे सोपविण्यात आले?
अ) सुखोई उ - ३० MKI ब) सुखोई सु – ३० MKI
क) सुखोई २० MKI ड) सुखोई ४०MKI

२१. 'इज ऑफ डूइंग बिझिनेस' (EoDB) आव्हान या कार्यक्रमाला सुरुवात झाली आहे. EoDB या आव्हानाबद्दल कोणते विधान अचूक आहे?
१) अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून व्यवसाय सूलभिकरणात ओळखल्या गेलेल्या सात समस्यांच्या निराकरणासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी १९ नोव्हेंबर २०१८ रोजी 'इज ऑफ डूइंग बिझिनेस' (EoDB) हे आव्हान सुरु केले आहे.
२) हे आव्हान कृत्रिम बुद्धीमत्ता, इंटरनेट ऑफ थिंग्ज, माहिती विश्लेषण, ब्लॉकचेन आणि इतर अत्याधुनिक तंत्रज्ञानावर आधारित नाविन्यपूर्ण कल्पनांना आमंत्रित करते.
अ) केवळ १ ब) केवळ २
क) १ किंवा २ यापैकी नाही. ड) १ आणि २ दोन्ही.

RELIABLE ACADEMY 9222333999

२२. प्रादेशिक व्यापार आर्थिक भागीदारी (RCEP) हा १६ देशांमध्ये झालेला एक मुक्त व्यापार करार आहे. त्यासंबंधी कोणते विधान अचूक आहे?
१) ASEAN आणि ६ ASEAN FTA भागीदारांच्या दरम्यान प्रस्तावित केला गेलेला मोठा प्रादेशिक मुक्त व्यापार करार आहे.
२) भारत , चीन, दक्षिण कोरिया, ऑस्ट्रेलिया, जपान आणि पाकिस्तान हे या गटाचे सदस्य आहेत.
अ) केवळ १ ब) केवळ २
क) १ आणि २ दोन्ही ड) यापैकी नाही.

२३. कोणत्या राज्यशासनाने 'कन्यासमृद्धी योजना' ही नवी योजना जाहीर केली आहे.
अ) हरियाणा ब) नवी दिल्ली
क) महाराष्ट्र ड) मध्यप्रदेश

२४. 'हर खेत को पाणी' हे भारत सरकारच्या खालीलपैकी कोणत्या प्रमुख मोहिमेअंतर्गत आहे?
अ) प्रधानमंत्री कृषी सिंचाई योजना.
ब) इंदिरा गांधी कृषी सिंचाई योजना
क) राष्ट्रीय सिंचन अभियान
ड) वरील पैकी कोणतेही नाही.

२५. २०२४ सालापर्यंत सहा कोटी शेतकऱ्यांना लाभ देण्याच्या उद्देशाने कोणत्या राज्यात 'शून्य खर्चाची नैसर्गिक शेती योजना (ZBNF)' योजना सुरु केली गेली?
अ) उत्तराखंड ब) हिमाचल प्रदेश
क) तेलंगणा ड) आंध्रप्रदेश.

२६. जुलै – १८ मध्ये दोन दिवसांच्या 'ट्रान्सफार्मिंग अर्बन लॅण्डस्केप' परिषद कोणत्या राज्यात आयोजित करण्यात आली होती?
अ) नवी दिल्ली ब) उत्तर प्रदेश
क) मध्यप्रदेश ड) गोवा

२७. देशातील पहिले प्लॅस्टिक मतदान ओळखपत्र वाटप करणारे खालीलपैकी कोणते राज्य आहेत ते ओळखा?
अ) गुजरात ब) त्रिपुरा
क) गोवा ड) कर्नाटक

२८. पुढीलपैकी कोणता एक व्यक्ती संसदेचा सभासद नसताना देखील दोन्ही सभागृहात उपस्थित राहू शकतो आणि विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे देऊ शकतो?
अ) महालेखापरिक्षक
ब) पंतप्रधानांचा आर्थिक सल्लागार
क) सरन्यायाधीश
ड) महान्यायवादी

२९. कोतवालाच्या बाबतीतील विसंगत पर्याय ओळखा.
अ) कोतवाल हा महसूल खात्यातील सर्वात शेवटचा कर्मचारी आहे.
ब) कोतवालाची नेमणूक जिल्हाधिकारी करतो.
क) कोतवालावर जवळचे नियंत्रण तलाठयाचे असते.
ड) कोतवालाच्या अर्जित रजा तहसीलदार मंजुर करतो.

३०. आणीबाणीच्या कालखंडात पुढीलपैकी राष्ट्रपतीला नसलेला अधिकार कोणता तो ओळखा?
अ) एखाद्या राज्यात राजकीय अस्थिरता निर्माण झाल्यास आणीबाणी घोषित करणे.
ब) युद्धजन्य परिस्थितीमुळे सुरक्षिततेच्या कारणावरुन त्या प्रदेशात आणीबाणी लागू करतो.
क) आणीबाणी लागू केलेल्या राज्याचा मुख्यमंत्री निवडणे.
ड) यापैकी नाही.

३१. केंद्र व राज्ये यांच्यातील खालीलपैकी कोणत्या प्रकारच्या संबंधांना म्युनिसिपल रिलेशन्स असे संबोधले जाते?
१) राज्याच्या कायदे करण्याच्या अधिकारावरील केंद्राचे नियंत्रण
२) राज्याच्या आर्थिक बाबीवरील केंद्राचे नियंत्रण
३) राज्याच्या प्रशासकीय क्षेत्रावरील केंद्राचे नियंत्रण
४) राज्याच्या योजना प्रक्रियेवरील केंद्राचे नियंत्रण
अ) फक्त ४ ब) फक्त १
क) फक्त ३ ड) फक्त २

३२. राज्यपालाच्या अर्थविषयक अधिकारातील चुकीचा पर्याय ओळखा.
अ) त्याच्या पूर्व परवानगीशिवाय धनविधेयक विधानसभेत मांडता येत नाही.
ब) दर पाच वर्षांनी राज्यपाल राज्य वित्त आयोगाची नेमणूक करतो.
क) राज्याच्या आकस्मिक निधीतून खर्च करण्यासाठी राज्यपालाची परवानगी आवश्यक असते.
ड) आणीबाणीच्या कालखंडात देशातील अधिकाऱ्यांचे वेतन स्थगित करु शकतो.

३३. योग्य जोडया लावा.

| अ गट | ब गट |
|---|---|
| १) सरपंच | i) ग्रामपंचायतीचे संघटन |
| २) कलम ४० | ii) ग्रामसभेची व्याख्या |
| ३) कलम २४३ | iii) ग्रामसभेचा अध्यक्ष |
| ४) उपसरपंच | iv) सरपंचाच्या अनुपस्थितीत ग्रामपंचायत बैठकीचा अध्यक्ष |

| | १ | २ | ३ | ४ |
|---|---|---|---|---|
| अ) | iii | i | ii | iv |
| ब) | iii | ii | i | iv |
| क) | iv | i | ii | iii |
| ड) | iii | i | iv | ii |

३४. लोकसभेचे असणारे सदस्यत्व (सद्यस्थितीत) ओळखा.
अ) राज्य - ५३०, केंद्रशासित प्रदेश - २०, ॲग्लो इंडियन – २
ब) राज्य - ५३०, केंद्रशासित प्रदेश - १३, ॲग्लो इंडियन – २
क) राज्य - ५२५, केंद्रशासित प्रदेश - ५, ॲग्लो इंडियन – २
ड) राज्य - ५३०, केंद्रशासित प्रदेश - १५, ॲग्लो इंडियन – ०

RELIABLE ACADEMY 9222333999

३५. जिल्हा परिषदेच्या बाबतीतील अयोग्य पर्याय ओळखा.
अ) जिल्हा परिषदेची स्थापना महाराष्ट्र जिल्हा पंचायत समिती अधिनियम १९६१ नुसार झाली.
ब) महाराष्ट्रात सध्या ३५ जिल्हा परिषदा आहेत.
क) जिल्हा परिषदेचा सचिव उपमुख्य कार्यकारी अधिकारी असतो.
ड) जिल्हा परिषदेमध्ये एकूण १० विषय समित्या आहेत.

३६. महिला व बालकल्याण समितीच्या कार्याबाबत असत्य विधाने ओळखा?
१) महिला व बालकांच्या आरोग्याची काळजी घेणे.
२) स्वावलंबी बनविण्याच्या योजना राबविणे.
३) कुपोषित बालकांची काळजी घेणे.
४) बालकांना खाण्यापिण्याचे सामान देणे.
५) महिलांना संरक्षण देणे.
अ) ३ व ४ ब) २ व ३
क) ४ व ५ ड) १ व २

३७. खालील कॅबिनेट मिशनच्या तरतुदी दिलेल्या आहेत त्यापैकी अयोग्य तरतूद शोधा.
१) सर्व अविशिष्ट प्रश्न / विषय प्रांताकडे सोपविण्यात येतील.
२) संघराज्यासाठी ब्रिटीश प्रांत आणि संस्थाने यांच्या प्रतिनिधींचा समावेश असलेले विधिमंडळ आणि कार्यकारी मंडळ स्थापन करण्यात येईल.
३) प्रांतांना आपले गट स्थापन करता येतील.
४) प्रत्येक गटाला स्वत: ची घटना निर्माण करता येईल.
अ) १, ३ आणि ४ ब) २ आणि ४
क) १, २, ३ आणि ४ ड) यापैकी नाही.

३८. संघराज्य शासनपद्धतीमध्ये ...........
१) केंद्र व राज्य यामध्ये अधिकारांची विभागणी केलेली असते.
२) केंद्रशासनाकडून राज्य शासनास अधिकार प्रदान केले जातात.
३) केंद्राकडे अधिकार एकवटलेले असतात.
४) केंद्र व राज्ये यांना समान अधिकार असतात.
अ) ३ ब) २ व ३
क) १ ड) ३ व ४

३९. भारतीय न्यायव्यवस्थेच्या बाबतीतील गैरलागू विधान कोणते ते ओळखा?
अ) भारतीय न्यायव्यवस्था ही एकेरी न्यायव्यवस्था आहे.
ब) गोवा राज्यासाठी नव्याने स्वतंत्र उच्च न्यायालय स्थापन करण्यात आले आहे.
क) २६ जानेवारी, १९५० रोजी सर्वोच्च न्यायालयाची स्थापना केली.
ड) सध्या भारतात २४ उच्च न्यायालये आहेत.

४०. पुढीलपैकी योग्य जोडया लावा.
१) घटना कलम क्रमांक १४ i) सांस्कृतिक अधिकार
२) घटना कलम क्रमांक १८ ii) धार्मिक अधिकार
३) घटना कलम क्रमांक २६ iii) पदव्यांची समाप्ती
४) घटना कलम क्रमांक २९ iv) कायद्यापुढे समानता

| | १ | २ | ३ | ४ |
|---|---|---|---|---|
| अ) | iii | iv | ii | i |
| ब) | i | iv | ii | iii |
| क) | iv | iii | ii | i |
| ड) | iii | ii | iv | i |

४१. गटविकास अधिकाऱ्यावर प्रशासकीय नियंत्रण पुढीलपैकी कोणाचे असते?
अ) मुख्य कार्यकारी अधिकारी
ब) उपमुख्य कार्यकारी अधिकारी
क) मुख्यमंत्री
ड) जिल्हाधिकारी

४२. खालीलपैकी कोणते विधान योग्य आहेत ते ओळखा?
१) ग्रामपंचायत सदस्यांचा कालावधी ग्रामपंचायतीच्या पहिल्या बैठकीपासून सुरु होतो.
२) ग्रामपंचायत सदस्यांचा कार्यकाल ५ वर्षाचा असतो.
३) सरपंचाचा कार्यकाल अडीच वर्षाचा असतो.
४) उपसरपंचाचा कार्यकाल पाच वर्षांचा असतो.
अ) १, २, ४ ब) १, २, ३,
क् १ ड) १, २

४३. लखनौ कराराचे कोणते एक प्रमुख तत्त्व होते याबाबत पुढील विधाने विचारात घ्या?
अ) अल्पसंख्यांकांचे हितसंबंध जोपासून त्यांना राजकीय प्रतिनिधित्व मिळवून देणे.
ब) भारतातील सर्व जातींना त्यांच्या प्रमाणात आरक्षण देणे.
क) भारतातील वेगवेगळ्या जमातींचे हितसंबंध हे परस्परांहून वेगळे आहेत.
ड) हिंदू – मुस्लीम यातील भेदाभेद कमी होऊन एकोपा निर्माण व्हावा.

४४. खालील पर्यायातून अयोग्य जोडी कोणती ती ओळखा.

| युद्ध | वर्ष |
|---|---|
| अ) दुसरे म्हैसूर युद्ध | – १८८० ते ८४ |
| ब) प्रथम इंग्रज + मराठा युद्ध | – १७७५ ते ८२ |
| क) तिसरे कर्नाटक युद्ध | – १७५६ ते ६० |
| ड) बक्सारची लढाई | – १७६४ |

४५. आर्य समाजाविषयी योग्य विधाने ओळखा.
अ) ईश्वर एक आहे, तो विश्वाचा निर्माता आहे.
ब) जाती व्यवस्था नष्ट करण्यासाठी संस्थेची स्थापना
क) वैदिक धर्माचे पुनरुज्जीवन करणे.
ड) ब्रिटिश सत्तेचे समर्थन करणे.

४६. बंगाल गॅझेट नामक पहिले भारतीय इंग्रजी वृत्तपत्र कोणी काढले?
अ) चार्ल्स मेटकाफ ब) राजाराम मोहन रॉय
क) गंगाधर भट्टाचार्य ड) बाळगंगाधर शास्त्री

४७. वेव्हेल योजनेमध्ये खालीलपैकी कोणत्या एका बाबीचा समावेश नव्हता?

RELIABLE ACADEMY 9222333999

अ) आंतरराष्ट्रीय संबंधांसाठी व व्यापारासाठी मात्र ब्रिटिश व्यक्तिचीच निवड व्हॉईसरॉयच्या कार्यकारी मंडळात करण्यात येईल.
ब) अस्पृश्यांना देखील व्हॉईसरॉयच्या कार्यकारी मंडळात प्रतिनिधित्व मिळेल.
क) व्हॉईसरॉयच्या कार्यकारी मंडळात हिंदू – मुस्लिमांचे सम प्रमाणात प्रतिनिधित्व असेल.
ड) व्हॉईसरॉयच्या कार्यकारी मंडळातील सदस्यांची संख्या वाढविण्यात येईल.

४८. भाऊ दाजी लाड यांच्याविषयी योग्य विधाने ओळखा.
१) त्यांचा जन्म ७ सप्टेंबर १८२४ रोजी गोव्यातील मांजरे येथे झाला.
२) १८४५ मध्ये मुंबईत ग्रॅन्ट मेडिकल कॉलेजची स्थापना झाली.
३) १८५१ मध्ये वैद्यकीय पदवी संपादन केली.
४) त्यांनी कर्करोगावर एक चांगले औषध शोधून काढल्यामुळे त्यांना धन्वंतरी म्हणून ओळखले जाते.
अ) फक्त १ ब) १, २, ३
क) २, ३, ४ ड) वरीलपैकी सर्व

४९. योग्य जोडया लावा.

| गट 'अ' | गट 'ब' |
|---|---|
| १) इलबर्ट बिल | i)जनरल डायर |
| २) व्हॅर्नाक्यूलर वृत्तपत्र कायदा | ii) लॉर्ड कर्झन |
| ३) बंगालची फाळणी | iii) लॉर्ड रिपन |
| ४) जालियनवाला बाग हत्याकांड | iv) लॉर्ड लिटन |

| | १ | २ | ३ | ४ |
|---|---|---|---|---|
| अ) | iv | iii | i | ii |
| ब) | ii | i | iv | iii |
| क) | i | ii | iii | iv |
| ड) | iii | iv | ii | i |

५०. कॉंग्रेसचे १९१६ मध्ये पार पडलेल्या अधिवेशनाच्या वैशिष्टयाबाबत योग्य विधाने ओळखा?
१) येथे मुस्लीम लिग व कॉंग्रेसमध्ये करार
२) अध्यक्ष ॲनीबेझंट होत्या.
३) येथे जहाल – मवाळ गट एकत्र आले.
४) हे अधिवेशन लखनौ येथे पार पडले.
अ) १, ३, ४ ब) १, २, ३
क) २, ३, ४ ड) वरील सर्व

५१. महात्मा गांधी यांच्याविषयी योग्य विधाने ओळखा.
अ) इ. स. १९२० – 'सत्याग्रह' या नव्या हत्याराचा अवलंब केला.
ब) इ. स. १९४२ – 'छोडो भारत आंदोलन'
क) इ.स. १९०६ – 'असहकार आंदोलन'
ड) इ. स. १९१५ – 'सेवाग्राम' आश्रमाची स्थापना

५२. १८५७ साली भारतात कालक्रमानुसार कोणत्या कोणत्या ठिकाणी विद्यापीठांची स्थापना करण्यात आली?
अ) कलकत्ता, मुंबई, मद्रास ब) मुंबई, मद्रास, कलकत्ता
क) मद्रास, मुंबई, कलकत्ता ड) कलकत्ता, मद्रास, मुंबई

५३. 'विधवा विवाह मंडळा' ची स्थापना पुढीलपैकी कोणी केली?
अ) व्हि. डी. सावरकर ब) एम. जी. रानडे
क) गोपाळ कृष्ण गोखले ड) बाल गंगाधर टिळक

५४. १) अयोध्येचा नवाब शुजा उद्दंला, मीर कासीम व मुघल बादशाह शाह आलम यांनी इग्रजांविरुद्ध मोहिम काढली
२) भारतामधील इंग्रजांच्या कारवायांना लगाम लावणे.
अ) १ हे विधान योग्य असून २ हे १ चे कारण आहे.
ब) १ हे विधान योग्य असून १ हे २ चे कारण आहे.
क) १ हे विधान योग्य असून २ हे १ चे कारण नाही.
ड) १ व २ हे दोन्ही अयोग्य विधाने आहेत.

५५. खालील दिलेले वृत्तपत्र, पुस्तके व त्यांचे संपादक यांच्या योग्य जोडया लावा.

| वृत्तपत्रे / पुस्तके | संपादक / लेखक |
|---|---|
| १) युगांतर | i) सचिंद्रनाथ संन्याल |
| २) भारतमाता | ii) विरेंद्रकुमार घोष |
| ३) बंदीजीवन | iii) अजित सिंह |
| ४) वंदेमातरम् | iv) मादामकामा |

| | १ | २ | ३ | ४ |
|---|---|---|---|---|
| अ) | ii | iii | i | iv |
| ब) | i | ii | iii | iv |
| क) | iv | iii | ii | i |
| ड) | iv | ii | i | iii |

५६. नॅशनॅलिस्ट पक्षाबाबत काय खरे नाही ते ओळखा?
१) सविनय कायदेभंग आणि करबंदी त्यांना मान्य होती.
२) ब्रिटीश साम्राज्यांतर्गत जबाबदार राज्यपद्धती प्राप्त करणे हे त्यांचे ध्येय होते.
३) हा पक्ष म्हणजे स्वराज्य पक्षाला आव्हान होता.
अ) फक्त ३ ब) १, २, ३
क) फक्त १ ड) फक्त २

५७. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांबाबत पुढील तीन विधानांचा विचार करा.
१) दलितांच्या राजकीय हक्कांसाठी त्यांनी सन १९३६ मध्ये स्वतंत्र मंजूर पक्षाची स्थापना केली.
२) जरी मी जन्माने हिंदू असलो तरी मरताना हिंदू राहणार नाही असे त्यांनी म्हटले होते.
३) ते त्याच वर्षी निवर्तले ज्या वर्षी त्यांनी बौद्ध धर्म स्वीकारला.
अ) २ बरोबर ब) १, २ व ३ बरोबर
क) १ व २ बरोबर ड) यापैकी नाही.

५८. महाराष्ट्रातील हवामानाची सर्वसाधारण वैशिष्टये कोणती?
१) मान्सून वाऱ्यामधील पर्जन्यामध्ये पडणारा खंड
२) प्रवाहाच्या अति वेगाने झीज होऊन सुपीक जमिनीचे वहन
३) पावसाव्यतिरिक्त हवामानाच्या अन्य आविष्काराचा प्रभाव
४) नैऋत्य मान्सून वाऱ्याच्या आगमन व निर्गमनामधील अनिश्चितता.
अ) १, ३, ४ ब) १, २, ३
क) वरील सर्व ड) २, ३, ४

RELIABLE ACADEMY 9222333999

५९. खालील पर्यायातून योग्य विधाने ओळखा?
१) विपणन व्यवस्था – वस्तु व सेवांच्या खरेदी - विक्रीची व्यवस्था
२) जागतिकीकरण - जागतिक बाजारपेठेसाठी अर्थव्यवस्था खुली करणे.
३) औद्योगिकीकरण – यंत्रसामुग्रीच्या वापरात वाढ होऊन उद्योगाचा विस्तार होणे.
४) शहरीकरण – लोकांचे शेती व्यवसायातून बिगर शेती व्यवसायात स्थलांतर होण्याची प्रक्रिया.
अ) २, ३, ४ ब) १, २, ३
क) १, ३, ४ ड) वरील सर्व

६०. खालीलपैकी कोणते घटक चलनवाढ निर्माण करतील याबाबत अचूक पर्याय निवडा?
१) तुटीचा अर्थसंकल्प
२) शिलकीचा अर्थसंकल्प
३) रिझर्व्ह बँकेचे कडक पैशाचे धोरण
४) रिझर्व्ह बँकेचे स्वस्त पैशाचे धोरण
अ) २ व ३ ब) १ व ४
क) १ व ३ ड) २ व ४

६१. भाववाढीचे खालीलपैकी सकारात्मक परिणाम कोणते ते ओळखा?
१) सुरुवातीला नफ्याचे प्रमाण वाढते.
२) उत्पादन वाढते.
३) रोजगार पातळी वाढते.
४) पैशाचे मुल्य कमी होते.
अ) १, ३ आणि ४ ब) २, ३, ४
क) वरील सर्व योग्य ड) १, २ आणि ३

६२. खालील विधाने वाचून अचूक पर्याय निवडा?
१) चालणारी चलनवाढ अर्थव्यवस्थेसाठी उपकारक असते.
२) चालणारी चलनवाढ म्हणजे चलनवाढीचा दर ३% ते १०% असणे.
३) रिझर्व्ह बँकेने भारत सरकारच्या सल्ल्याने भारतीय अर्थव्यवस्थेसाठी चलनवाढीच्या दराची २% ते ६% लक्ष्य पातळी निश्चित केली आहे.
अ) १ व ३ ब) वरील सर्व
क) १ व २ ड) फक्त १

६३. खालील विधानांपैकी योग्य विधाने कोणते ते ओळखा?
१) तिसऱ्या पंचवार्षिक योजनेचा कालावधी १९६१ – ६६ हा होता.
२) या काळात अपेक्षित लक्ष्य ७.५ इतके होते.
३) तर साध्य दर २.७ होता.
४) यामध्ये शेती व उद्योग विकासावर विशेषत: भर देण्यात आला.
अ) १, ४ ब) २, ३, ४
क) वरीलपैकी सर्व ड) १, २, ४

६४. स्वर्णजयंती ग्रामस्वयंरोजगार योजनेमध्ये कोण - कोणत्या योजनाचा समावेश करण्यात आला आहे?
१) एकात्मिक ग्रामीण विकास कार्यक्रम
२) दशलक्षी विहीरी योजना
३) गंगा कल्याण योजना
४) अंत्योदय अन्न योजना
अ) २ व ३ ब) १, २, ३
क) २, ३, ४ ड) १, ३, ४

६५. चलनविषयक धोरणाची पुढीलपैकी कोणकोणती उद्दिष्टये आहेत ते ओळखा?
१) चलनवाढ स्थिर राखणे
२) आर्थिक वाढ सुकर करणे
३) आर्थिक स्थैर्य प्रस्थापित करणे.
४) विनिमय दर स्थिर करणे.
५) रोजगार वृद्धी करणे.
अ) १, २ व ४ ब) १ व २
क) वरीलपैकी सर्व ड) १, २ व ३

६६. जमिनीची दर हेक्टरी उत्पादकता म्हणजे ..............
अ) एका एकरमधील झालेले एकूण उत्पन्न.
ब) अन्नधान्य खालील एकूण क्षेत्र भागिले अन्नधान्याचे एकूण उत्पादन
क) अन्नधान्याचे एकूण उत्पादन भागिले अन्नधान्य खालील एकूण क्षेत्र
ड) अन्नधान्याचे सरासरी उत्पादन भागिले एकूण क्षेत्रफळ

६७. खालीलपैकी योग्य विधाने कोणते ते ओळखा?
१) स्थुल देशांतर्गत उत्पादनात सर्व अंतिम वस्तु व सेवांचे बाजार भावानुसार येणारे मुल्य असते.
२) स्थुल देशांतर्गत संकल्पनेत घसाऱ्याचा समावेश असतो.
३) स्थूल देशांतर्गत संकल्पनेत घसाऱ्याचा समावेश नसतो.
४) स्थूल देशांतर्गत उत्पादनात सरकारने दिलेल्या अनुदानाचा समावेश नसतो.
अ) १, २, ३ ब) १, २, ४
क) १, ४ ड) १, ३, ४

६८. योग्य जोडया लावा.

| प्रेस / मिल | शहर |
|---|---|
| १) इंडिया सिक्युरिटी प्रेस | i) होशंगाबाद |
| २) सिक्युरिटी प्रिंटींग प्रेस | ii) नाशिक रोड |
| ३) सिक्युरिटी पेपर मिल | iii) हैदराबाद |
| ४) न्यु सिक्युरिटी पेपर मिल | iv) देवास |

| | १ | २ | ३ | ४ |
|---|---|---|---|---|
| अ) | ii | iii | i | iv |
| ब) | i | ii | iv | iii |
| क) | iii | ii | i | iv |
| ड) | iv | i | iii | ii |

६९. खालीलपैकी दारिद्रयाचे आर्थिक परिणाम कोणते ते ओळखा?
१) उत्पन्नात विषमता २) संसाधनाचा अपव्यय
३) मानवी मूल्यांचा ऱ्हास ४) आर्थिक गुन्हेगारीत वाढ
अ) २, ३, ४ ब) १, २, ४
क) वरीलपैकी सर्व ड) १, २

RELIABLE ACADEMY 9222333999

७०. पुढील विधाने वाचून योग्य पर्याय निवडा?
१) रेपो दर म्हणजे ज्या व्यापारी बँका आर.बी. आयकडून अल्प कालावधीसाठी कर्ज घेतात तो दर
२) रिव्हर्स रेपो दर म्हणजे व्यापारी बँका ज्या दराने एका दिवसासाठी आर.बी.आय. ला कर्ज देतात तो दर होय.
३) आर.बी.आय. चलनवाढीच्या परिस्थितीत रेपो रेट वाढतो.
अ) २, ३ ब) वरील सर्व योग्य
क) १ व २ ड) १ व ३

७१. खालील पर्यायातून योग्य पर्याय निवडा?
१) अर्थसंकल्पीय खर्चाचे वर्गीकरण महसूली खर्च व भांडवली खर्च असे केले जाते.
२) १९८७ – ८८ पासून अर्थसंकल्पीय खर्चाचे वर्गीकरण नियोजित खर्च व बिगरनियोजित खर्च असेही केले जाऊ लागले.
३) २०१७ – १८ पासून अर्थसंकल्पीय खर्चाचे वर्गीकरण योजना खर्च व योजनेत्तर खर्च असे केले जाते.
अ) १ व २ योग्य ब) १ व ३ योग्य
क) १, २ व ३ योग्य ड) फक्त १ योग्य

७२. १० व्या पंचवार्षिक योजनेसंबंधीत योग्य जोडी ओळखा.
अ) औद्योगिक क्षेत्रातील वृद्धी दर – ८.८%
ब) साध्य वृद्धी दर – १०%
क) दारिद्रय कमी करणे – १९.२%
ड) अपेक्षित वृद्धी दर – ८.८२%

७३. योग्य जोडया लावा.

| (अभयारण्ये) | (ठिकाणे) |
|---|---|
| १) फणसाड | i) अहमदनगर |
| २) सागरेश्वर | ii) उस्मानाबाद |
| ३) रेहेकुरी | iii) औरंगाबाद |
| ४) येडशी (रामलिंगघाट) | iv) जळगांव |
| ५) गौताळा (औटम घाट) | v) बुलढाणा |
| ६) यावल | vi) सांगली |
| ७) टिपेश्वर | vii) रायगड |
| ८) ज्ञानगंगा | viii) यवतमाळ |

| | १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अ) | vii | vi | i | ii | iii | iv | viii | v |
| ब) | vii | vi | i | ii | iv | iii | viii | v |
| क) | v | vii | ii | i | iv | iii | vi | viii |
| ड) | vi | vii | i | ii | iii | iv | v | viii |

७४. खालीलपैकी कोणते विधान अयोग्य आहे ते ओळखा?
१) २०११ च्या जनगणनेनुसार महाराष्ट्राची महिला साक्षरता भारताच्या महिला राष्ट्रीय सरासरीपेक्षा जास्त आहे.
२) महाराष्ट्रातील सर्वाधिक लोकसंख्यावाढ १९७१ साली नोंदवण्यात आली.
३) बाल लिंगप्रमाणात महाराष्ट्राची परिस्थिती भारताच्या तुलनेत चांगली आहे.
अ) १, २, ३ ब) फक्त ३
क) १ व ३ ड) १ व २

७५. कोकण किनाऱ्यावर अनेक ..... व...... निर्मिती झाली आहे.
अ) मिठागरे व सरोवरांची ब) सरोवरे व खाडयांची
क) पुळणांची व खाडयांची ड) बेट व सरोवरांची

७६. महाराष्ट्र राज्यात आढळणारा खडक प्रकार व त्याच्याशी संबंधित प्रदेशाच्या योग्य जोडया लावा.

| खडक प्रकार | प्रदेश |
|---|---|
| १) धारवाड खडक | i) चंद्रपूर, गडचिरोली |
| २) कडप्पा (कलाडगी) खडक | ii) सिंधुदुर्ग, कोल्हापूर |
| ३) विंध्ययन खडक | iii) नागपूर, भंडारा |
| ४) आर्कियन खडक | iv) चंद्रपूर, वर्धा |

| | १ | २ | ३ | ४ |
|---|---|---|---|---|
| अ) | iii | ii | iv | i |
| ब) | ii | iii | iv | i |
| क) | iii | iv | ii | i |
| ड) | ii | iii | i | iv |

७७. खालीलपैकी कोणते विधान अयोग्य आहेत ते ओळखा?
१) अमावस्याच्या दिवशी येणाऱ्या भरती ओहोटीला 'भांगाची भरती ओहोटी' असे म्हणतात.
२) अमावस्याच्या दिवशी येणारी भरती ओहोटी ही सर्वात मोठी असते.
३) शुक्ल व कृष्ण पक्षाच्या अष्टमीला येणाऱ्या भरती ओहोटीला 'उधानाची भरती ओहोटी' असे म्हणतात.
४) ज्या ठिकाणी सुर्यामुळे भरती निर्माण होते त्यावेळी त्या ठिकाणी चंद्रामुळे ओहोटी निर्माण होते.
अ) २, ४ ब) १, ३
क) १, २, ३ ड) १, ३, ४

७८. खालीलपैकी कोणते शहर सर्वाधिक राजमार्गाने जोडलेले आहे?
अ) नागपूर – सोलापूर ब) सोलापूर – मुंबई
क) मुंबई – पुणे ड) नाशिक – धुळे

७९. पश्चिम राजस्थानात ....... खनिजे सापडतात.
अ) चुनखडक, जिप्सम, मीठ
ब) फक्त चुनखडक
क) मँगनीज, डोलोमाईट, ॲल्युमिनिअम
ड) फक्त जिप्सम

८०. योग्य जोडया लावा.

| जिल्हा | ज्योतिर्लिंगे |
|---|---|
| १) पुणे | i) भिमाशंकर |
| २) बीड | ii) त्र्यंबकेश्वर |
| ३) नाशिक | iii) परळी वैजनाथ |
| ४) औरंगाबाद | iv) औंढा नागनाथ |
| ५) हिंगोली | v) घृष्णेश्वर |

| | १ | २ | ३ | ४ | ५ |
|---|---|---|---|---|---|
| अ) | i | iii | ii | v | iv |
| ब) | i | iv | ii | iii | v |
| क) | i | v | ii | iii | iv |
| ड) | i | ii | iii | iv | v |

RELIABLE ACADEMY 9222333999

८१. नकाशात रेखांकित करण्यात आलेल्या विभागास अमेरिकन हवामानशास्त्रज्ञ डॉ. त्रिवार्था यांनी काय नाव दिले?



अ) उष्ण कटिबंधीय निम्न शुष्क हवामानाचा विभाग
ब) उष्ण कटिबंधीय वर्षा अरण्याचा हवामान विभाग
क) उष्ण कटिबंधीय उष्ण व आर्द्र हवामान विभाग
ड) उष्ण कटिबंधीय दमट व कोरडे हवामान विभाग

८२. खालीलपैकी .... हे विधान खरीप हंगामाशी संबंधित नाही.
अ) खरीप हंगामातील पिकांची पेरणी जून - जुलै महिन्यात केली जाते.
ब) खरीप हंगामातील पिकांची कापणी ऑक्टोबर – नोव्हेंबर महिन्यात केली जाते.
क) खरीप हंगामातील पिकांची पेरणी ऑक्टोबर – नोव्हेंबर महिन्यात केली जाते.
ड) तांदूळ, बाजरी, कडधान्ये, ज्वारी ही पिके खरीप हंगामामध्ये घेतली जातात.

८३. योग्य जोडया लावा.

| | |
|---|---|
| १) ओखा व सलाया | i) ओडिसा |
| २) नागापट्टणम् | ii) तामिळनाडू |
| ३) काकीनाडा | iii) गुजरात |
| ४) पराद्वीप | iv) पश्चिम बंगाल |
| ५) हल्दिया | v) आंध्रप्रदेश |

| | १ | २ | ३ | ४ | ५ |
|---|---|---|---|---|---|
| अ) | iii | ii | v | i | iv |
| ब) | iii | i | v | ii | iv |
| क) | iii | ii | i | v | iv |
| ड) | iii | v | ii | i | iv |

८४. भारतात मॅंगनीज .................. या राज्यांत आढळतो.
अ) कर्नाटक, ओडिशा
ब) मध्यप्रदेश , महाराष्ट्र
क) गोवा
ड) वरील सर्व

८५. महाराष्ट्रातील ....... जिल्हयात तांदळाचे पीक पावसावर अवलंबून असते.
अ) ठाणे, रायगड, चंद्रपूर, भंडारा
ब) ठाणे, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग
क) चंद्रपूर, भंडारा, नागपूर, गडचिरोली, गोंदिया
ड) भंडारा, गडचिरोली, नागपूर, रत्नागिरी

८६. खालील वर्णनावरुन पठाराचे नाव ओळखा.
१) हे पठार पश्चिमेला अरवली रांग आणि दक्षिणेला विंध्य रांग यांच्यामध्ये येते.
२) या पठाराची सरासरी उंची ५०० मी आहे.
३) या प्रदेशातून माही आणि बेटवा नद्या उगम पावतात.
अ) माळवा पठार
ब) छोटानागपूर पठार
क) विंध्याचल – वाघेलखंड पठार
ड) बुंदेलखंड पठार

८७. अंतर्वक्र आरशाने तयार झालेली प्रतिमा कशा स्वरुपाची असते.
अ) पदार्थ नाभीय बिंदूच्या पलीकडे असेल तर आभासी
ब) पदार्थ नाभीय बिंदू आणि ध्रुवाच्या मध्ये ठेवला असेल तर आभासी
क) नेहमी आभासी व सुलटी
ड) नेहमी वास्तव आणि सुलटी

८८. खालीलपैकी कोणते घटक प्रथिनामध्ये असतात.
१) कार्बन
२) हायड्रोजन
३) फॉस्फरस
४) ऑक्सिजन
५) नायट्रोजन
अ) १, २, ४, आणि ५
ब) १, ३, ४ आणि ५
क) १, २, ३ आणि ५
ड) वरील सर्व

८९. दुहेरी विस्थापन अभिक्रिया ................ ही आहे.
अ) $२Zn + O_2 \xrightarrow{\text{उष्णता}} २ZnO\uparrow$
ब) $Zn + H_2SO_4 \longrightarrow ZnSO_4 + H_2\uparrow$
क) $CACl_2 + H_2SO_4 \longrightarrow CaSO_4 + २HCl\uparrow$
ड) $२H_2 + O_2 \longrightarrow २H_2O\uparrow$

९०. खालीलपैकी कोणते किरणोत्सारी मुलद्रव्ये हे मानवनिर्मित आहे?
१) रेडिअम
२) थेरिअम
३) युरेनिअम
४) पोलोनिअम
अ) फक्त ४
ब) १ व २
क) १ व ४
ड) वरील सर्व

९१. खालील पर्यायातून योग्य पर्याय निवडा?
१) सोडिअम हवेत उघडा ठेवल्यास पेट घेतो.
२) पोटॅशिअम सर्वाधिक क्रियाशिल धातू आहे.
३) सोने आणि चांदी कमी क्रियाशिल धातू आहेत.
४) लोह आणि तांबे मध्यम क्रियाशिल धातू आहेत.
अ) ३, ४
ब) वरील सर्व
क) २, ३
ड) १, २

९२. खालीलपैकी कोणत्या प्राणी उती आहेत ते ओळखा?
१) अभिस्तर उती
२) संयोजी उती
३) स्नायू उती
४) चेता उती
५) विभाजी उती
६) स्थायी उती
अ) १, ४, ५, ६
ब) १, ३, ४, ५, ६
क) १, २, ३, ४
ड) १, २, ३, ४, ६

९३. ४cm उंचीची एक वस्तू एका अंतर्वक्र आरशासमोर ३६cm अंतरावर ठेवली आहे. आरशाचे नाभीय अंतर १२cm आहे. तर वस्तूची प्रतिमा आरशापासून किती अंतरावर तयार होईल?
अ) – १८cm
ब) २८cm
क) ८cm
ड) १८cm

RELIABLE ACADEMY 9222333999

९४. भिंगाच्या शक्तीचे एकक ................ आहे.
अ) अॅमीटर ब) लेन्सॉमीटर
क) डायॉप्टर ड) फोफल मीटर

९५. खालीलपैकी अयोग्य विधाने कोणती ती ओळखा?
१) अणुने इलेक्ट्रॉन गमावल्यामुळे धन आयन निर्माण करतात अशा मूलद्रव्यांना 'धातू' असे म्हणतात.
२) अणुने इलेक्ट्रॉन कमावल्यामुळे ऋन आयन निर्माण करतात अशा मूलद्रव्यांना 'अधातू' असे म्हणतात.
अ) १ व २ ब) फक्त १
क) फक्त २ ड) यापैकी नाही.

९६. खालील पर्यायातून अचूक पर्याय निवडा.
१) ज्या अभिक्रियेत ऑक्सिजन संयोग पावतो त्या अभिक्रियेस 'क्षपण' असे म्हणतात.
२) ज्या अभिक्रियेत हायड्रोजन संयोग पावतो त्या अभिक्रियेस 'क्षपण' असे म्हणतात.
३) ज्या अभिक्रियेत ऑक्सिजन मुक्त होतो त्या अभिक्रियेस 'क्षपण' असे म्हणतात.
४) ज्या अभिक्रियेत हायड्रोजन मुक्त होतो त्या अभिक्रियेस 'क्षपण' असे म्हणतात.
अ) फक्त ३ ब) वरील सर्व बरोबर
क) फक्त १ ड) २, ३

९७. खालील विधानांपैकी सत्य नसलेले विधान कोणते ते ओळखा?
१) तांब्याला अतिशय जास्त उष्णता दिल्यास काळया रंगाचा कॉपर ऑक्साइडचा थर जमा होतो.
२) झिंकला जास्त उष्णता दिल्यास झिंक ऑक्साइड तयार होतो.
३) ग्रॅफाइट हा धातू विद्युत वहन करतो.
अ) फक्त १ ब) फक्त ३
क) फक्त २ ड) यापैकी नाही.

९८. खालील विधाने विचारात घ्या.
१) धातु तापवण्यासाठी मुख्यत: धातुची भांडी वापरतात.
२) धातुमधून उष्णतेचे अभिसरण सहजतेने होते.
अ) १ व २ दोन्ही बरोबर आहेत पण २ हे १ चे योग्य कारण आहे.
ब) १ व २ दोन्ही बरोबर आहेत पण २ हे १ चे योग्य कारण नाही.
क) १ बरोबर तर २ चुक
ड) १ चुक तर २ बरोबर

९९. वैश्विक द्रावक म्हणजे काय याबाबत खालील विधाने विचारात घ्या?
१) ज्यामध्ये द्राव्य विरघळू शकते.
२) ज्यामध्ये द्राव्याचे प्रमाण जास्त असते.
३) ज्यामध्ये सर्व प्रकारचे द्राव्य विरघळू शकतात.
४) ज्यामध्ये द्रावकीय ऊर्जा जास्त असते.
अ) १, २ ब) १, ३, ४
क) ३, ४ ड) २, ४

१००. शैवाल संबंधी खालील विधाने विचारात घेऊन सत्य असणारे कथन निवडा?
१) शैवाल हे एकपेशीय तसेच बहुपेशीय सुद्धा असतात.
२) शैवालमध्ये प्रकाशसंश्लेषी रंगद्रव्ये असतात.
३) शैवाल स्वयंपोषण पद्धतीचा अवलंब करतात.
४) पेशिभित्तीका कायटीनयुक्त असते.
अ) १, २ व ३ ब) १ व ४
क) १ व २ ड) २ व ४

RELIABLE ACADEMY 9222333999

The Name Of Quality Reliable Academy® Founder : Manohar E. Patil
Knowledge is Power
ISO 9001 : 2015

# महा TEST SERIES / PSI / STI / ASO (२०१९)

**Kalyan-Nashik-Parbhani** संयुक्त पूर्व सराव परिक्षा पेपर **Marks: 100**

**Paper No: 7** **TEST SERIES BY : Nandini Manohar Patil** **Time: 1 hr.**

## PAPER NO. 7 (ANS. KEY)

| प्रश्न क्र. | उत्तर | प्रश्न क्र. | उत्तर | प्रश्न क्र. | उत्तर | प्रश्न क्र. | उत्तर |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | ब | २६ | ब | ५१ | ब | ७६ | अ |
| २ | ड | २७ | ब | ५२ | अ | ७७ | ब |
| ३ | ब | २८ | ड | ५३ | क | ७८ | अ |
| ४ | ब | २९ | ब | ५४ | अ | ७९ | अ |
| ५ | क | ३० | क | ५५ | अ | ८० | अ |
| ६ | क | ३१ | क | ५६ | क | ८१ | अ |
| ७ | ब | ३२ | ड | ५७ | ब | ८२ | क |
| ८ | क | ३३ | अ | ५८ | क | ८३ | अ |
| ९ | ब | ३४ | ब | ५९ | ड | ८४ | ड |
| १० | ड | ३५ | ब | ६० | ब | ८५ | ब |
| ११ | ड | ३६ | क | ६१ | ड | ८६ | अ |
| १२ | अ | ३७ | ड | ६२ | ब | ८७ | ब |
| १३ | ब | ३८ | क | ६३ | अ | ८८ | अ |
| १४ | क | ३९ | अ | ६४ | ब | ८९ | क |
| १५ | क | ४० | ड | ६५ | क | ९० | अ |
| १६ | क | ४१ | अ | ६६ | क | ९१ | ब |
| १७ | क | ४२ | अ | ६७ | ब | ९२ | क |
| १८ | अ | ४३ | क | ६८ | अ | ९३ | अ |
| १९ | अ | ४४ | अ | ६९ | ब | ९४ | क |
| २० | ब | ४५ | क | ७० | ब | ९५ | ड |
| २१ | ड | ४६ | क | ७१ | क | ९६ | ड |
| २२ | अ | ४७ | अ | ७२ | अ | ९७ | ब |
| २३ | क | ४८ | ब | ७३ | अ | ९८ | क |
| २४ | अ | ४९ | ड | ७४ | ब | ९९ | क |
| २५ | ड | ५० | अ | ७५ | क | १०० | अ |

RELIABLE ACADEMY 9922333999